## रे.दि.मु.नं.१६८/२०१२ मधील नि.९८ वरील आदेश
### (पार्वती पवार वि. उमेश तुपे व इतर)
**(CNR NO-MHST05-000696-2010)**

प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे वारसदार यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम ३ अन्वये दाखल केलेला आहे.

२. **अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे –**

वादीने सदरचा दावा हा जाहीर ठराव ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्यातील वादी श्रीमती पार्वती बाजीराव पवार (ठाकर) या दिनांक ०५.१२.२०२५ रोजी पाली, ता.कराड येथे मयत झालेल्या असून त्यांनी त्यांचे हयातीत नोंदणीकृत मृत्यूपत्र करुन ठेवलेले होते. सदर मृत्युपत्रानुसार सदरील दावेदार हे मयत वादी यांचे मृत्यूपश्चात मृत्युपत्रानुसार मिळालेले कायदेशीर हक्क व अधिकारानुसार त्यांना प्रस्तुतचा दावा यापुढे चालविणेचा आहे. त्यानुसार आवश्यक ती दुरुस्ती होणे आवश्यक व गरजेचे आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याचे मुळ स्वरुपात कसलाही बदल होत नाही. म्हणून वादींनी अर्ज मंजूर करणेची विनंती केली आहे.

३. प्रतिवादींनी सदर अर्जास म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द विना म्हणणे आदेश पारीत करण्यात आला.

४. अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले. सदरचा दावा हा जाहीर ठराव व ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. सदरचा दावा सुरु असताना वादी ही दिनांक ०५.१२.२०२५ रोजी मयत झालेली आहे. वादीने तिचे हयातीत दावा मिळकतीबाबत मृत्यूपत्र करुन ठेवलेले आहे. दावा मिळकत ही मृत्यूपत्राद्वारे अर्जदार यांच्या नावे केलेली आहे. त्यामुळे सदर मृत्यूपत्रानुसार सदर अर्जदार यांना हक्क व अधिकार प्राप्त होत आहेत. त्यामुळे त्यांना दाव्यात सामील करुन घेण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे. सदर

नियोजित दुरुस्ती दावा गुणदोषावर निकाली होणेकरीता आवश्यक आहे. तसेच दाव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरीताही दुरुस्ती आवश्यक आहे. वादीने मागितलेली सदरची दुरुस्ती ही आवश्यक असल्यामुळे सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणत्याही प्रकारचा बदल होणार नाही. नियोजित दुरुस्ती झालेस प्रतिवादी यांचे कसलेही नुकसान होणार नाही. याउलट अर्ज नामंजूर केल्यास वादींचे अपरिमित नुकसान होईल. त्यामुळे वादींचा अर्ज मंजूर करणे मला न्यायोचित वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादींनी १४ दिवसांच्या आत दावा दुरुस्त करावा व दावा दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी.

JYOTI JAGNNATH MANE
Digitally signed by JYOTI JAGNNATH MANE
Date: 2026.02.10 11:21:41 +0530

ठिकाण – कराड (जे.जे.माने)
दिनांक – ०९/०२/२०२६ ४ थे सह दिवाणी न्यायाधिश व.स्तर, कराड